# वेदना आणि सूजेच्या गोळ्या

## त्या सुरक्षितपणे कशा घ्याव्यात

**तुमची गोळी:** ................................ **दिवसातून** ............... **वेळा,** ............... **दिवस**

**वेदनांच्या दोन गोळ्या एकत्र कधीही घेऊ नका**

ही सर्वात सामान्य चूक आहे, आणि यामुळे पोटात रक्तस्राव आणि मूत्रपिंड (किडनी) निकामी होते. आम्ही दिलेल्या गोळीसोबत तुम्ही बाजारातून स्वतः वेदनाशामक गोळी घेतल्यास, नकळत दुप्पट मात्रा घेतली जाते.

**ही सर्व एकाच प्रकारची औषधे आहेत — एका वेळी फक्त एकच:**
Combiflam · Zerodol · Hifenac · Brufen · Voveran · Nise · Nucoxia · Ibugesic · Flexon · Dolokind

**वेदनांचे मलम, स्प्रे आणि पट्टी (patch) हेही यातच मोजले जातात.** अंगाला लावण्याचे जे काही वापरता ते आम्हाला सांगा.

**पॅरासिटामोल वेगळे आहे — ते सोबत घेणे सुरक्षित आहे**

पॅरासिटामोल (Dolo 650, Crocin, Calpol) वरील यादीत नाही. वेदना आटोक्यात येत नसतील, तर दुसरी सूजरोधक गोळी घेण्यापेक्षा पॅरासिटामोल जोडणे अधिक सुरक्षित आहे.
**मोठ्यांसाठी: एका वेळी 1 ग्रॅम (500 mg च्या दोन गोळ्या) पर्यंत, 24 तासांत जास्तीत जास्त चार वेळा.** यापेक्षा जास्त नाही.
लक्षात ठेवा, सर्दी-तापाच्या अनेक औषधांत आधीच पॅरासिटामोल असते.

## घेण्याची पद्धत

- **नेहमी जेवणानंतर**, पूर्ण ग्लास पाण्यासोबत.
- वर लिहिलेल्या दिवसांपुरतेच. ही रोज दीर्घकाळ घेण्याची औषधे नाहीत.
- औषध घेताना भरपूर पाणी प्या.

**सुरू करण्यापूर्वी आम्हाला सांगा, जर तुम्हाला असेल**

मूत्रपिंडाचा त्रास · पूर्वी पोटात अल्सर किंवा रक्तस्राव · दमा · हृदयाची कमजोरी किंवा उच्च रक्तदाब · गर्भारपण · किंवा तुम्ही रक्त पातळ करण्याची, रक्तदाबाची किंवा लघवीची औषधे घेत असाल

**गोळी थांबवा आणि संपर्क करा, जर**

काळी किंवा डांबरासारखी शौच · रक्ताची उलटी किंवा कॉफीच्या रंगाची उलटी · तीव्र पोटदुखी · पाय किंवा चेहऱ्यावर सूज · लघवी खूप कमी होणे · दम लागणे · अंगावर पुरळ